**ठळक बातम्या**

- मुंबईकरांना एकाच कार्डवरुन सर्व प्रवासी सुविधांचं कार्ड लवकरच काढता येणार
- भ्रष्टाचार प्रकरणी नाशिकमधल्या लष्कराच्या १५ अधिकाऱ्यांच्या विरोधात सीबीआयकडून गुन्हा दाखल
- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचं दर्शन घेणार

**आणि**

- क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन

**<><><><><>**

मुंबईतल्या बेस्ट, उपनगरीय रेल्वे, मेट्रो इत्यादी सर्व प्रवासी सेवांचं एकाच माध्यमातून तिकिट देणारं मुंबई वन कार्ड लवकरच सुरू होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत वार्ताहर परिषदेत बोलताना ते म्हणाले,

याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराजांचा समृद्ध इतिहास, तसंच राज्यातल्या इतर सांस्कृतिक आणि धार्मिक स्थळांचं दर्शन घडवणारी भारत गौरव रेल्वेगाडी येत्या १६ जुलैपासून सुरू होणार असल्याची माहितीही फडणवीस यांनी आज दिली. यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातल्या रेल्वे प्रकल्पांसाठी केलेल्या भरीव तरतुदी त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केल्या.

नुकत्याच झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ४ हजार ८१९कोटी रुपये खर्चून २४० किलोमीटर लांबीच्या गोंदिया-बल्लारशहा

रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाला मंजुरी दिली असल्याची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी दिली. ते म्हणाले,

मुंबईसाठी लवकरच २३८ नव्या वातानुकूलित उपनगरीय रेल्वेगाड्या आणण्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. तसंच कवच ५.० लवकरच कार्यान्वित होणार असून यामुळे रेल्वे यंत्रणेची सुरक्षा आणि कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

वेव्ह्ज ही अशा प्रकारची जगातली सर्वात मोठी परिषद असून जगभरातल्या १०० पेक्षा जास्त देशांचे प्रतिनिधी यात सहभागी होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह वेव्ह्जच्या तयारीचा त्यांनी आज आढावा घेतला. ही परिषद दर वर्षी भरवण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची इच्छा असून तिचं आयोजन मुंबईतच होईल, असंही फडणवीस यांनी सांगितलं. मुंबईत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीच्या स्थापनेला, तसंच मालाड इथं या क्षेत्राला चालना देण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा उभारायला मंजुरी दिल्याबद्दल त्यांनी केंद्र सरकारचे आभार मानले.

वेव्ह्ज २०२५ मुळे नागरिकांच्या सृजनशीलतेला वाव आणि व्यासपीठ मिळेल, असा विश्वास केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

एसटी कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याच्या ७ तारखेला होईल, ही अध्यक्ष म्हणून आपली जबाबदारी असेल, अशी ग्वाही परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. ते आज महामंडळाच्या मुख्यालयात अध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारताना बोलत होते. एसटी कर्मचाऱ्यांना मार्च महिन्यात फक्त ५६ टक्के वेतन देता आलं, हे अत्यंत दुर्दैवी असून उर्वरित वेतनासाठी आपण

अर्थखात्यांच्या सचिवांची भेट घेतल्याचंही सरनाईक यांनी यावेळी सांगितलं. विविध सवलतीपोटी शासनाकडे महामंडळाचे थकीत असलेले १ हजार ७६ कोटी रुपये तातडीने द्यावेत अशी आग्रही मागणी सरनाईक यांनी यावेळी केली. सध्या ३ हजार नवीन बसेसची निविदा प्रक्रिया सुरू असून भविष्यात ग्रामीण आणि दुर्गम भागात उपयुक्त ठरेल अशा मिडी बसेस घेण्यात येणार आहेत, असंही सरनाईक म्हणाले.

**<><><><><>**

मुंबईत झालेल्या २६/११ दहशतवादी हल्ल्याचा मास्टर माईंड तहव्वूर राणाला भारतात आणण्यात आलं असून या प्रकरणाचा  पुढील तपास आणि कायदेशीर प्रक्रियांमध्ये राज्य सरकार राष्ट्रीय तपास संस्थेला पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.  तहव्वुर राणाला भारतात आणल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले. या दहशतवादी हल्ल्याचा कट रचणारा म्होरक्या आपल्या ताब्यात असून तपासात आणखी काही गोष्टी उघडकीला  येतील असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

नाशिकच्या तोफखाना केंद्र आणि आर्मी एव्हिएशन सेंटरमधील १५ अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याप्रकरणी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग- सीबीआयनं त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करत कारवाई केल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिक इथल्या तोफखाना केंद्र आणि आर्मी एव्हिएशन सेंटरमध्ये काम करणारे लेखापरीक्षक, सहाय्यक लेखाधिकारी आणि लिपिकांनी वेतन आणि भत्ते वेळेवर देण्यासाठी लष्करी कर्मचाऱ्यांकडून पैसे उकळले. सीबीआय आणि पुण्याच्या संरक्षण लेखा नियंत्रकांनी संयुक्तपणं टाकलेल्या छाप्यात व्हॉट्सअॅप चॅट्स, लाच मागणीचे संदेश आणि बँक व्यवहारांचे पुरावे हाती लागले. याशिवाय, लाच घेण्यासाठी वापरलेली बँक खाती आणि त्यातील व्यवहारांची माहितीही सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी तपासली.

त्यातून मिळालेल्या माहितीच्या आधारे  भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली दोषींवर गुन्हे दाखल झाले आहेत.

दरम्यान, सीबीआयनं मुंबई, नाशिक, लखनऊ, अहमदाबाद आणि नागपूर इथंही काही लष्करी अधिकाऱ्यांच्या घरी छापे टाकले आहेत. सीबीआयचा तपास सुरू असून, याप्रकरणी आणखी खुलासे होण्याची शक्यता ही वृत्तसंस्थेच्या बातमीत वर्तवली आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दोन दिवसांच्या राज्याच्या दौऱ्यावर येत आहेत. रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५ व्या पुण्यतिथी निमित्त होणाऱ्या कार्यक्रमात उद्या ते भाग घेतील. त्यापूर्वी किल्ले रायगडाच्या पायथ्याशी  पाचाड इथं राजमाता जिजाऊ यांच्या समाधीचं ते दर्शन घेतील.

या दौऱ्यामुळं मुंबई-गोवा महामार्गावरची वाहतूक नियंत्रित करण्याचा निर्णय स्थानिक प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार मुंबई-गोवा महामार्गावर खारपाडा ते कशेडी दरम्यान  उद्या  अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे. ही बंदी पहाटे एक वाजल्यापासून ते दुपारी तीन वाजेपर्यंत असेल. या बंदीतून जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या वाहनांना वगळले आहे.

**<><><><><>**

थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महात्मा फुले यांना आदरांजली वाहिली. महात्मा फुले हे मानवतेचे खरे सेवक होते, त्यांनी समाजातल्या शोषित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी आपलं जीवन समर्पित केलं. देशासाठी त्यांचं अमूल्य योगदान प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतल्या निवासस्थानी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावर संदेशातून महात्मा फुले यांना अभिवादन केलं.

<><><><><>

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यातल्या फुले वाड्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालक मंत्री अजित पवार यांनी फुले वाड्यातील महात्मा फुले यांच्या स्मारकाला अभिवादन केलं.

<><><><><>

अमेरिकेनं अतिरीक्त कर लादायला स्थगिती दिल्यानं देशातले शेअर बाजारात आज जोरदार तेजीत होते. सेन्सेक्समधे आज दिवसअखेर १ हजार ३१० अंकांची वाढ झाली, आणि तो ७५ हजार १५७ अंकांवर बंद झाला. निफ्टीही ४२९ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ८२९ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

प्रसिद्ध उद्योगपती मधुर बजाज यांचं आज पहाटे मुंबईत निधन झालं. ते ६३ वर्षांचे होते. गेले काही दिवस मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. देशातल्या अग्रणी दुचाकी वाहन उद्योग बजाज ऑटोचे ते मानद संचालक होते. त्याखेरीज महाराष्ट्र स्कूटर लिमिटेड चे अध्यक्ष होते.

<><><><><>

बुलढाणा जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर मेहकर इथं गाडी ट्रकला धडून झालेल्या अपघातात दोन जण ठार तर तीन जण जखमी झाले चालकाला डुलकी लागल्यानं हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकता नाईट राईडर या संघांमध्ये सामना होणार आहे. चेन्नईच्या चिदंबरम स्टेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होणाऱ्या या सामन्यात कोलकातानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.

**<><><><><>**

राज्यात काल कोकण, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्रात हवामान कोरडं होतं.

येत्या २ दिवसात राज्यात सर्वत्र तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसंच तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची आणि सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**